निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
३० जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३५ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### शाहिरीत असावी अन्यायाविरुद्धची 'धार' आणि माणुसकीची 'ममता'-ज्येष्ठ शाहीर बजरंग अंबी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/शाहिरी हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाजप्रबोधनाचे एक प्रभावी शस्त्र आहे. ज्याप्रमाणे एक आई आपल्या मुलाला मायेने जवळ घेऊन योग्य दिशा दाखवते, तसेच शाहिराने समाजातील अनिष्ट प्रथांवर प्रहार करताना त्यात 'आईची ममता' ठेवून समाजाला सन्मार्गावर आणले पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शाहीर बजरंग अंबी यांनी केले.




सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जालना येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागातर्फे आयोजित 'शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या' नवव्या दिवशी ते बोलत होते. 'शाहिरीतून समाजप्रबोधन' या विषयावर त्यांनी शिबिरार्थींना मौलिक मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या ओघात शाहीर अंबी यांनी शाहिरी कलेचे मर्म उलगडून सांगतानाच विद्यार्थ्यांना समाजसुधारणेचा कानमंत्र दिला. त्यांनी केवळ भाषणापुरते मर्यादित न राहता, ज्वलंत सामाजिक विषयांवर प्रकाश टाकला. यामध्ये प्रामुख्याने तरुण पिढीला व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश. स्त्री भ्रूणहत्या: मुलींच्या जन्माचे स्वागत आणि सन्मान करण्याचे आवाहन. वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्याची गरज.पर्यावरणाचे रक्षण हेच मानवाचे कर्तव्य.या विषयांवर अंबी यांनी प्रत्यक्ष शाहिरी सादरीकरण केले, ज्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

दुपारच्या सत्रात अंबी यांनी विद्यार्थ्यांकडून शाहिरी गायनाचा सराव करून घेतला. एक उत्तम शाहीर घडण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींवर त्यांनी भर दिला. यामध्ये प्रसंगावधान राखून आवाजात बदल करण्याचे कसब.अभिनयाद्वारे शाहिरी अधिक प्रभावी कशी करावी, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक त्यांनी दिले.शाहिरी ही परिवर्तनाची चळवळ आहे. शाहिराच्या शब्दांत अन्यायाविरुद्ध लढण्याची धार हवीच, पण त्याचवेळी माणुसकी आणि संवेदनशीलता जपली जाणे काळाची गरज आहे, असेही त्यांनी नमूद केले.या शिबिराला जिल्ह्यातील अनेक नामवंत शाहिरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला.शिबिराच्या नवव्या दिवसाचा समारोप प्रा. कल्याण उगले यांनी उपस्थितांचे आभार मानून केला. जेईएस महाविद्यालयाचा हा उपक्रम लोककलेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी मैलाचा दगड ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### महाराष्ट्राच्या कन्येची सुवर्ण भरारी: तनु भान देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट'; प्रधानमंत्री मोदींच्या हस्ते गौरव



**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतानाच, महाराष्ट्रासाठी एक अत्यंत अभिमानास्पद बातमी राजधानीतून आली आहे. दिल्लीतील करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या राष्ट्रीय छात्र सेना (NCC) रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने देशातील 'सर्वोत्कृष्ट कॅडेट' (Best Cadet) हा सर्वोच्च बहुमान पटकावला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तनुला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आले. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टिनेंट जनरल वीरेंद्र वत्स यांची प्रमुख उपस्थिती होती.

हे यश साधेसुधे नाही. देशभरातील १७ विविध संचालनालयांमधील सुमारे २० लाख कॅडेट्सच्या विशाल समूहातून तनुची निवड करण्यात आली आहे. आर्मी विंगमधून (सीनियर विंग) तिने हे ऐतिहासिक यश संपादन केले. शिस्त, शारीरिक क्षमता, बौद्धिक चाचणी आणि अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर तिने सर्व राज्यांच्या स्पर्धकांवर मात करत महाराष्ट्राचा झेंडा देशात पुन्हा एकदा फडकवला.

'विकसित भारत'चे निर्माते: प्रधानमंत्री मोदींकडून कौतुक

यावेळी कॅडेट्सना संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या राष्ट्रभक्तीचा गौरव केला. प्रधानमंत्र्यांचे भाषणातील काही महत्त्वाचे मुद्दे राष्ट्र प्रथम: 'राष्ट्र प्रथम - कर्तव्यनिष्ठ युवा' हे ब्रीदवाक्य केवळ शब्द नसून ती देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे.विकसित भारताचे आधारस्तंभ: समोर असलेले हे तरुण केवळ गणवेशातील कॅडेट्स नसून, ते 'विकसित भारत'चे खरे निर्माते आहेत.शिस्त आणि त्याग: तनु भान सारख्या तरुणांचे परिश्रम, त्याग आणि कडक अनुशासन हेच देशाला जागतिक स्तरावर प्रगतीपथावर नेणारे मुख्य आधारस्तंभ आहेत.महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने नेहमीच देशात आपला दबदबा कायम राखला आहे. तनु भानच्या या सुवर्ण कामगिरीमुळे महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिने प्रशिक्षणातील सर्व कठीण टप्पे अत्यंत आत्मविश्वासाने पार पाडले, जे राज्यातील हजारो तरुण मुला-मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# बारामतीत जनसागराचा महापूर



**महाराष्ट्र पोरका!**

## लोकनेते अजितदादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार











**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे/ बारामती/** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावाती नेतृत्व, राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनसामान्यांचे 'दादा' अजित पवार अनंत विलीले झाले. आज बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अत्यंत शोकाकुल वातावरणात आणि शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी अवघी बारामतीच नव्हे, तर महाराष्ट्र लोटला होता.

बड्या नेत्यांची मांदियाळी: केंद्रापासून राज्यापर्यंत श्रद्धांजली

अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी किती मोठी आहे, याची प्रचिती आज अंत्यसंस्कारावेळी



आली. देशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी अनेक नेत्यांना अश्रू अनावर झाले होते.

**मंत्रिमंडळाची उपस्थिती आणि प्रशासकीय मानवंदना**

या दुःखद प्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, नीलम गोऱ्हे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील जवळपास सर्वच दिग्गज मंत्री उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, हसन मुश्रीफ, पंकजा मुंडे, गिरीश महाजन यांसारख्या ज्येष्ठ मंत्र्यांनी आपल्या सहकाऱ्याला अखेरचा सलाम केला.

आंध्र प्रदेशचे शिक्षण मंत्री नारा लोकेश यांच्यासह परराज्यातील नेत्यांची उपस्थिती दादांच्या दांडग्या जनसंपर्काची साक्ष देत होती.प्रशासनाच्या वतीने मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली, तर पोलिसांनी हवेत फैरी झाडून आणि बिगुल वाजवून 'दादां'ना मानवंदना दिली.

**बारामतीत जनसागराचा उद्वेग आणि हुंदका**

पहाटेपासूनच विद्या प्रतिष्ठान परिसरात लोकांची गर्दी उसळली होती. अजितदादा अमर रहेच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

आमचा आधार गेला! अशा शब्दांत उपस्थित शेतकरी आणि कष्टकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रशासनाला गर्दी हाताळताना मोठी कसरत करावी लागली. हातातील कामे सोडून आलेला सामान्य माणूस, शेतकरी आणि महिलांच्या डोळ्यांतील पाणी दादांच्या लोकप्रियतेची पावती देत होते.

राजकारणातील एका पर्वाचा शेवट

अजित पवार म्हणजे 'सडेतोडपणा' आणि **'प्रशासनावर पकड'** असलेले नेतृत्व. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या विकासाचा एक इंजिन थांबल्याची भावना राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. बारामतीचा विकासपुरुष आज कायमचा शांत झाला, मात्र त्यांनी उभी केलेली विकासकामे आणि कार्यकर्त्यांची फळी सदैव त्यांची आठवण करून देत राहील.

## प्रजासत्ताक दिन संचलन २०२६: महाराष्ट्राचा चित्ररथ देशात प्रथम!




**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली/प्रतिनिधी**/देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा डंका पुन्हा एकदा वाजला आहे. विविध राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला असून, केंद्र सरकारने आज या निकालाची अधिकृत घोषणा केली.या स्पर्धेत जम्मू-काश्मीर राज्याने द्वितीय, तर केरळ राज्याने तृतीय क्रमांक मिळवला आहे.यशाचे गमक: 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक'यंदा महाराष्ट्राने आपल्या चित्ररथासाठी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आणि सामाजिक संदेश देणारी संकल्पना निवडली होती. 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित या चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सांस्कृतिक वारसा: चित्ररथाद्वारे महाराष्ट्राचा लाडका सण 'गणेशोत्सव' आणि त्याचा सामाजिक वारसा अधोरेखित करण्यात आला.आर्थिक भरारी: केवळ उत्सवच नव्हे, तर या उत्सवातून निर्माण होणारा रोजगार आणि त्यातून साध्य होणारी 'आत्मनिर्भरता' चित्ररथात प्रभावीपणे मांडली होती.कलाकारांचा उत्साह: चित्ररथावरील भव्य गणेशमूर्तीसोबतच पारंपारिक वेशातील ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या ऊर्जावान सादरीकरणामुळे संपूर्ण कर्तव्यपथ मंत्रमुग्ध झाला होता.इतर विभागांतील विजेतेकेवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विविध विभागांतही विजेत्यांची घोषणा करण्यात आली:विभागविजेतासर्वोत्कृष्ट राज्य चित्ररथमहाराष्ट्र (प्रथम)सेना दल (Sena Dal) भारतीय नौदल (Indian Navy) निमल्ष्करी दलदिल्ली पोलीसकेंद्रीय मंत्रालय गटसांस्कृतिक मंत्रालययाशिवाय, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि **'वंदे मातरम'** नृत्य समूहाला त्यांच्या विशेष कामगिरीसाठी विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरामहाराष्ट्राला मिळालेल्या या बहुमानामुळे राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागात आनंदाचे वातावरण आहे. महाराष्ट्राची लोककला, परंपरा आणि आधुनिक विचारांची सांगड घालणाऱ्या या चित्ररथाने राष्ट्रीय स्तरावर राज्याची मान उंचावली आहे.

## प्रशासनाने गमावला एक शिस्तबद्ध लोकनेता
## मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण प्रशासकीय वर्तुळावर शोककळा पसरली आहे. आज मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या विशेष शोक सभेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना अत्यंत जड अंतःकरणाने श्रद्धांजली वाहण्यात आली.



'कर्तव्यदक्ष आणि वक्तशीर नेतृत्व हरपले'

यावेळी बोलताना अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, अजित पवार यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात नेहमीच प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि सर्वोच्च कर्तव्यभावनेने काम केले. त्यांच्या कामाची पद्धत अत्यंत शिस्तबद्ध आणि वेळेचे पालन करणारी होती. त्यांच्या जाण्याने राज्य शासनाने एक खंबीर, कर्तव्यदक्ष आणि वक्तशीर नेतृत्व गमावले आहे. प्रशासनावर त्यांची असलेली पकड आणि कामाचा उरक ही त्यांची ओळख कायम स्मरणात राहील, असेही त्यांनी नमूद केले.

या शोक सभेला प्रशासनातील अनेक दिग्गज अधिकारी उपस्थित होते. त्यांनी दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. यामध्ये प्रामुख्याने डॉ. इकबालसिंह चहल, मनीषा म्हैसकर, अश्विनी भिडे, असिम कुमार गुप्ता, विकासचंद्र रस्तोगी, वेणुगोपाल रेड्डी, अनुपकुमार सिंग, राधिका रस्तोगी, एकनाथ डवले, सौरभ विजय, डॉ. हर्षदीप कांबळे, अतुल पाटणे, संजय खंदारे, एस. चोक्कलिंगम, रणजितसिंह देओल, वीरेंद्र सिंह, गणेश पाटील, संतोष कुमार, दिलीप घुमरे, जयश्री भोज, अंशु सिन्हा, राजेश गवांदे, विजय वाघमारे, मकरंद देशमुख तसेच मंत्रालयातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी या प्रसंगी उपस्थित होते.

**दोन मिनिटांचे मौन आणि प्रार्थना**

शोकाकुल वातावरणात उपस्थित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत नेत्याला मानवंदना दिली. यावेळी अजित पवार यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात प्रशासन सहभागी असून, त्यांना हे मोठे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करण्यात आली.

अजित पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न येणारी आहे, अशी भावना यावेळी मंत्रालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याच्या चेहऱ्यावर दिसत होती.

# 'कामाचा झंझावात' शांत झाला!

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक पर्वाचा अकाली आणि धक्कादायक अंत; 'दादा' नावाचं वादळ काळाच्या पडद्याआड.महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते आले आणि गेले, पण 'शब्दाचा पक्का' आणि 'कामाचा वाघ' अशी ओळख कमावलेला एकच नेता होता–अजित अनंतराव पवार. विमान अपघाताची ती बातमी वणव्यासारखी पसरली आणि अवघा महाराष्ट्र क्षणभर सुन्न झाला. व्हॉट्सपवरचे मेसेज असोत वा टीव्हीवरील हेडलाईन्स, कुणालाही यावर विश्वास ठेवणे कठीण जात होते. पण नियतीला काही वेगळंच मान्य होतं. 'अजित' ज्याला कुणी जिंकू शकत नव्हतं, त्याला काळाने आपल्या कचाट्यात ओढलं. आज बारामतीच नव्हे, तर अवघा महाराष्ट्र पोरका झाला आहे.

अजितदादा म्हणजे केवळ एक नाव नव्हतं, तर तो एक 'ब्रँड' होता. सकाळी ७ वाजता मंत्रालयात हजर राहणारा हा नेता प्रशासनासाठी कर्दनकाळ तर जनतेसाठी आधारवड होता. 'दादा' या शब्दाचे दोन अर्थ असतात, एक दहशतीचा आणि दुसरा हक्काच्या माणसाचा. अजितदादा दुसऱ्या गटातले होते. त्यांच्याकडे गेलेला सामान्य माणूस कधीही रिकाम्या हाताने परतला नाही. काम होणार असेल तर आता सांगतो, नाही होणार असेल तर तोंडावर सांगतो, हा त्यांचा रोखठोकपणाच त्यांची ताकद होती.

अनेकांनी त्यांच्या राजकीय निर्णयांवर टीका केली. कुणी त्यांना 'सत्तेचे लोभी' म्हटले, तर कुणी 'काकांना सोडून जाणारे' म्हटले. पण या टीकेकडे त्यांनी कधीच लक्ष दिले नाही. त्यांचा ठाम विश्वास होता की, सत्तेत राहिल्याशिवाय विकासकामे मार्गी लागत नाहीत. सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले, ईडीचा ससेमिरा मागे लागला, पण दादांनी कधीही रडगाणे गायले नाही. उलट, सत्तेत जाऊन 'लाडकी बहीण' सारख्या योजना प्रभावीपणे राबवून त्यांनी सिद्ध केले की, त्यांचा पिंड हा केवळ विरोधासाठी विरोध करण्याचा नसून अंमलबजावणीचा आहे.

एक मिश्किल आणि हळवं व्यक्तिमत्व

वरवर कठोर वाटणाऱ्या दादांच्या मनात एक मिश्किल माणूस दडलेला होता. त्यांच्या सभांमध्ये होणारी टोलेबाजी आणि हशा पिकवणारी वक्तव्ये हा महाराष्ट्राच्या विरंगुळ्याचा भाग होता. भाषणातील वक्तृत्व कला आणि कामाची हातोटी यांचा असा संगम दुर्मिळच. काका शरद पवारांशी असलेले त्यांचे नाते आणि त्यानंतरचे राजकीय मतभेद यावर कितीही चर्चा झाली, तरी दादांचा आपल्या कामावरचा विश्वास कधी डगमगला नाही. नुकत्याच झालेल्या निवडणुकांतील पराभवाने ते खचले नाहीत, कारण ते लढवय्ये होते.

दादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील 'शिस्त' हरवली आहे. सत्तेच्या राजकारणात ते अनेकवेळा उलटफेर करणारे ठरले असतील, पण जनतेच्या मनात त्यांची प्रतिमा 'कामाचा माणूस' अशीच राहिली. आज ते आपल्यात नाहीत, ही कल्पनाच सहन होत नाही. विमान अपघाताच्या त्या भीषण घटनेने महाराष्ट्राच्या एका तडफदार नेतृत्वाचा बळी घेतला आहे.अजितदादा पवार हे नाव महाराष्ट्राच्या मातीत आणि लोकांच्या मनात कायमचे कोरले गेले आहे. ते केवळ बारामतीचे नव्हते, तर ते संपूर्ण महाराष्ट्राचे 'दादा' होते. अशा या कर्तृत्ववान, धाडसी आणि दयाळू लोकनेत्याला महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.

**-भावपूर्ण श्रद्धांजली!**

# निशाणा येथे खंडोबा यात्रेचा उत्साह; मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते होणार महापूजा



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली (प्रतिनिधी)** औंढा नागनाथ तालुक्यातील निशाणा येथे रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी खंडोबा यात्रेनिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे विशेष औचित्य साधून सकाळी ७:१५ वाजता मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते महापूजा व महाआरती संपन्न होणार आहे.

निशाणा ग्रामस्थांच्या वतीने यात्रेनिमित्त तीन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.१ फेब्रुवारी (रविवार) सकाळी ७:१५ वा: अभिषेक, महापूजा आणि महाआरती (मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत) सकाळी १०:०० वा: भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप.रात्री ७:०० ते ९:०० वा: लहाडीचा कार्यक्रम रात्री १०:०० वा: जागरण गोंधळाचा कार्यक्रम.

२ फेब्रुवारी (सोमवार) रात्री ८:०० वा: पारंपारिक 'काठीचा भंडारा' उत्सव,३ फेब्रुवारी (मंगळवार) यात्रेची सांगता भव्य कुस्त्यांच्या दंगलीने होईल, जिथे पंचक्रोशीतील मल्ल आपले कसब दाखवतील.

मनोज जरांगे पाटील यांच्या आगमनामुळे निशाणा गावात आणि परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. ग्रामस्थांच्या वतीने महापूजेसाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. या धार्मिक सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन निशाणा येथील ग्रामस्थांनी केले आहे.

# रशिया - युक्रेन युद्ध व अमेरिकेने ठरवलेली विदेश निती

नुकतेच अमेरिका देशात राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुका पार पडल्या. आणि दुसऱ्यांदा डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेसारख्या बलाढ्या आणि सर्व क्षेत्रात प्रगत असलेल्या देशाचे राष्ट्राध्यक्ष झाले. डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी मार्च २०२२ पासून रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी रशिया सारख्या देशाच्या शेजारी राष्ट्र असलेला युक्रेन या देशावर सैन्य कारवाई करण्याचे, आणि रशिया सारख्या प्रबळ देशाला स्वतः च्या राष्ट्रहितासाठी संबंधित युक्रेन या देशावर युद्ध लादले. संपूर्ण जग आज रशिया आणि युक्रेन या दोन देशात चालत असलेल्या युद्धा संदर्भात सावधगिरी पण भयभीत आहेत. याचे महत्वपूर्ण कारण म्हणजे जगाच्या पाठीवर सर्वात जास्त अणुबॉम्ब असणारा देश म्हणजे रशिया, नुसते अनुबॉम्ब नाही तर अनेक प्रकारचे मध्यम व दुरीचे क्षेपणास्त्र. अनेक प्रकारचे असलेले युद्ध सामुग्री ,किंवा आणि युद्धात दुसऱ्या देशाने हल्ला केल्या नंतर स्व हिताचे संरक्षणासाठी असलेले, एस ३००,एस ४०० किंवा एस ५०० असलेले असंख्य संरक्षण प्रणाली ज्याला एअर डिफेन्स सिस्टम असे नाव देण्यात आले आहे.तसेच युरेनियम वर चालणारी ओरोशेनिक महा भयंकर खउइच् मिसाईल,या मध्ये सर्व साधारण इस्कंदर आणि इतर बरेच काही असलेले रडार सिस्टम, सुखोई ५७, हेलिकॉप्टर,असे अनेक प्रकारचे व विविध स्वरुपात असलेले युद्ध साहित्य म्हणजेच युद्धाच्या भुमित वापरात येणारे अनेक प्रकारचे साहित्य रशिया सारख्या देशात निर्माण होते.आणि इतर देशांना सुद्धा पुरविल्या जाते.त्या मध्ये जगात रशिया आणि भारत या दोन देशात असलेली मैत्री हे संपूर्ण जगाला माहीत आहे.भारताने सुद्धा रशिया सारख्या देशा कडुन अनेक प्रकारचे विविध प्रकारचे युद्ध सामुग्री विकत घेतलेली आहे.त्या मध्ये सुखोई, एस-४०० डिफेन्स सिस्टम सध्या भारता जवळ सुद्धा आहे.

रशिया सारख्या देशाकडे किंवा जगाकडे असलेले सैन्य आणि त्यांच्याकडे असलेले क्षेपणास्त्र, युद्धासाठी वापरात येणारे विमान ,किंवा पाण्यात असलेले नैदल या सर्व गोष्टींची मांडणी येथे करणे आवश्यक असे नाही. महत्त्वाचे म्हणजे रशिया सारखा देश आणि त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आलास्का येथिल बैठक तीही रशिया - युक्रेन युद्धावर आधारित होती. सहाजिकच युक्रेन देशाला, ३० राष्ट्राच्या एकत्र असलेले संघटना म्हणजे नाटो राष्ट्र होय. आणि या नाटो राष्ट्राला समोर करून, नेतृत्व करणारा देश म्हणजे अमेरिका होय. अमेरिकेची विदेशी निती आजपर्यंत प्रत्येक देशाला मित्रत्वाचा देखावा, जगातल्या कोणत्याही दोन राष्ट्रात असलेला वाद, त्यापैकी अमेरिकेच्या हितासाठी असलेला राष्ट्र कोणता? फक्त त्याच राष्ट्राला समर्थन करणे, आणि त्याच देशासोबत व्यावसायिक दृष्टिकोनातून व्यापार राहिलेली आहे. एकेकाळी अमेरिका हा सर्वात बलाढ्या आणि प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जात असे. आणि आता सुद्धा अमेरिका ही जगातली मोठी आणि एक बलाढ्या राष्ट्रच आहे. पण सध्या अमेरिकेचे जगावर असलेले बादशाही ही धोक्यात आलेली आहे. याची मुख्य कारण म्हणजे अमेरिका देशा कडे जे ५,५००( पाच हजार पाचशेच्या) आसपास असलेले अणुबॉम्ब आहेत .आणि या अणुबॉम्ब चा धाक दाखवत अमेरिकेने अनेक राष्ट्राला धमकावत जगावर आपले वर्चस्व करण्यासाठी. जसे उत्तर कोरिया, चीन, भारत अशा अनेक देशाला इतर राष्ट्राकडून होत असलेले त्रास. जसे भारत- पाकिस्तान सारख्या देशांमध्ये सतत असलेला वाद आणि सर्व जगाला माहीतच आहे. पाकिस्तान हा एक दहशतवादी राष्ट्र तर आहेच. त्या काळचे तत्कालीन अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी पाकिस्तानच्या अबेटाबाद या शहरात अगदी, पाकिस्तान च्या सैन्य कार्यालयाच्या बाजुला, ओसामा बिन लादेन ला प्रत्यक्षात आपले सैन्य पाठवले.व त्या ठिकाणी पकडले ते ठिकाण शेवटी पाकिस्तान मध्येच अल कायदा दहशतवादी संघटनेचा म्होरक्या ओसामा बिन लादेन पाकिस्तान मध्ये सापडतो. तरीसुद्धा जाणून बुजून स्वतःच्या राष्ट्रहितासाठी पाकिस्तानला अमेरिका सतत जवळी करत आहे. आणि सध्या भारत देशाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सतत करत असतो. कारण नुकत्याच पहेलगाम मध्ये पर्यटकांवर झालेला दहशतवादी हल्ला. आणि त्यानंतर भारत देशाने ऑपरेशन शिंदुर अंतर्गत केलेली सैन्य कारवाई, आणि यामध्ये भारत देशाने काही विदेशी आणि स्वदेशी वापरण्यात आलेले ब्रह्मोस सारखी क्षेपणास्त्र, एस ४०० आणि, आकाश एअर डिफेन्स सिस्टम द्वारे अगदी २२ मिनिटात पाकिस्तानला गुडघ्यावर आणले. म्हणजेच भारत देश हा बदलत्या युगाचा एक महत्त्वपूर्ण व ताकतवर राष्ट्र निर्माण होत आहे. ही गोष्ट अमेरिकेच्या सारख्या राष्ट्राला जगातल्या कुठल्याही राष्ट्राच्या प्रगतीवर असलेले राष्ट्र. हीच राष्ट्र अमेरिकेच्या मनात कायम टोचत राहिलेली आहे. सध्या भारत देश हा स्वतःच्या प्रगतीचा मार्ग अवलंबत आहे. पूर्वी देश संरक्षणासाठी इतर राष्ट्रावर अवलंबून राहण्याची गरज कमी होत चाललेली आहे. देशाच्या रक्षणासाठी अमेरिका, रशिया, जर्मनी, इटली, इजरायल अशा राष्ट्राकडून सैन्य साहित्य विकत घेत असे. पण देश आता स्वतःचे युद्ध साहित्य स्वतः निर्मित करत आहे. म्हणजे देशाच्या संरक्षणासाठी स्वावलंब होत आहे.

आणि अशीच एक घटना नुकत्याच इस्रायल आणि इराण मध्ये झालेला युद्ध. सर्वात महत्त्वाचे म्हणजे इराण अणुबॉम्ब बनवण्याचा उद्देशाने तयार केलेले युरेनियम साठ्यावर केलेला अमेरिकेने हल्ला. कारण इतर राष्ट्रीय ही संरक्षणाच्या व सैन्यपालाच्या दृष्टीने जास्त ताकतवर होऊ नये हा एकमेव उद्देश केवळ अमेरिका राष्ट्राचा आहे. या सर्व घटना थोडी थोडक्यात आणि अत्यंत महत्त्वाची माहिती द्वारे, अमेरिकेची विदेशी नीती ही कोणत्याही राष्ट्राच्या हितासाठी नसून. ती स्वतःच्या हितासाठी आहे असे स्पष्ट दिसून येते. आणि इतर दोन राष्ट्रात चालू असलेले युद्ध भले एक राष्ट्र दुसरे राष्ट्राला जळुन खाक केले तरी चालेल.सध्या रशिया सोबत भारत व चीन ही दोन राष्ट्रे क्रुड ऑइल (कच्चे तेल) जागतिक बाजारपेठेच्या किमती पेक्षा कमी किमतीत रशियाकडून कच्चे तेल आयात करत आहेत. आणि त्याचा फायदा इतर राष्ट्रे सुद्धा घेत आहेत.अमेरिका सुद्धा रशिया कडुन युरेनियम सारखा किंमती धातु विकत घेत आहे.याचा प्रत्यक्ष खुलासा रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन यांनी प्रत्यक्ष पणे रशियन टेलिव्हिजन ला इंटरव्ह्यू मध्ये केला आहे.तरी सुद्धा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर रशियाकडून तेल खरेदी करत असलेल्या कारणाने, डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीला व्यापार संबंधात भारतावर २५ % टेरिफ (आयात शुल्क) लावले.आणि भारत हा रशिया कडुन कच्चे तेल आयात करुन.रशिया ला युक्रेन युद्धात आर्थिक मदत करत आहे.अशा प्रकारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर आरोप करत आहे.म्हणजेच ''चोराच्या उलट्या बोंबाआणि रशिया सोबत पुन्हा व्यापार करण्यास बंदी घालण्याचा अयशस्वी प्रयत्न करत आहेत.खास करून रशिया कडुन तेल आयात थांबवावी या उद्देशाने अमेरिकन टॅरीफ कर ही योजना बंधनकारक ठरली नाही .कारण भारत देशाने रशिया देशा कडुन तेल आयात करणे थांबवले नाही. उलट देश हिताचे निर्णय म्हणून इतर देशा सोबत व्यापार करण्याचे ठरवले.आणि अमेरिका सोबत व्यापार कमी करण्याचा निर्णय घेतला.आणि देशांना युरोप, फ्रान्स ब्रिटन आणि इतर देशांना सुद्धा भारतावर आयात शुल्क वाढवण्याचे सल्ला दिला.परंतु इतर देशान या अमेरिकन सल्ल्याकडे दुर्लू केले.आणि भारताची आर्थिक कोंडी व्हावी आणि भारताने अमेरिकेसमोर गिडगिडावे या उद्देशाने पुन्हा अतिरिक्त २५ % अतिरिक्त पुणे टॅरीफ कर लादले. अशाप्रकारे ५०% टॅरीफ कर लावण्यात यशस्वी झाला.परंतु अमेरिकेचे आर्थिक सल्लागार यांना हे अयोग्य वाटले. परंतु अमेरिकेची ही भारतीय व्यापाराची आर्थिक कोंडी करण्यास जमने आयोग्य अशा प्रकारे अनुभव आला.तरी सुद्धा भारत सरकारने देश हिताच्या बाजुने निर्णय घेत, काही महत्वपूर्ण व्यवहार करत वस्तू च्या मुळ किमतीवर दीडपट अधिक पैसा निर्यातीसाठी देने भाग पाडले. यामुळे नक्कीच भारताची जागतिक पातळीवर आर्थिक परिस्थिती बिकट करण्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे करत आहेत.असे यावरुन स्पष्ट कळते.

कारण रशियाच्या दोन महत्त्वपूर्ण सरकारी तेल कंपन्यावर युरोप, फ्रान्स, ब्रिटन आणि अमेरिकेने बंदी घातलेली आहे. आणि याचा विपरीत परिणाम भारतीय तेल निर्मित कंपनी रिलायन्स इंडस्ट्री, भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम, इंडियन ऑइल,नायरा पेट्रोल पंप सारख्या खाजगी व सरकारी तेल कंपन्या वर जास्त प्रभाव दाखवू शकले नाही. तसे पाहता जागतिक तेल कंपन्या जसे ओपेक राष्ट्र कडून सुद्धा हे नैसर्गिक साधन संपत्ती मधील तेल अग्रगण्य असणारे इराक, इराण ,सौदी अरब व इतर तेल उत्पादक राष्ट्राकडून सुद्धा भारत क्रूड ऑइल मिळू शकते. परंतु रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन हे भारत व चीन या दोन देशाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या कमी भावाने क्रूड ऑइल ऑइल खरेदी विक्री करत आहे. आणि आर्थिक फायदा साठी चीन व भारत ही र दोन राष्ट्रे रशिया कडून क्रूड ऑइल आयात करत आहेत.

आणि तेच क्रूड ऑइल रिफायनरी करून इतर देशांना सप्लाय करत आहेत. रशियाने दिलेले जागतिक बाजारपेठेचे किमतीपेक्षा जे क्रूड ऑइल भारत देशाने खरेदी केले. त्या क्रूड ऑइलचा भारत देशाने खूप फायदा घेतला. आणि स्वतःची इंधन आपत्ती सुद्धा पूर्ण करत आहे. सध्या अमेरिकेची विदेशनी तीही दुसऱ्या राष्ट्राला केवळ ते केवळ खातकच ठरते. हे यावरून स्पष्ट इथे कळतं. कारण भारताच्या निर्यात तीवर अतिरिक्त शुल्क आकारणे आणि आर्थिक कोंडी करणे.

हा अमेरिकेचा डाव भारताने योग्यरीत्या उधळून लावला. आणि ही अमेरिकेची विदेशनीती जगातला प्रत्येक देशाला कळून चुकले आहे. सध्या सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रशिया- युक्रेन युद्ध, तसे पाहता रशियाचे युक्रेन देशा शी काहीही घेणे देणे नाही. परंतु युक्रेन चे राष्ट्राध्यक्ष वेलोदिमिर जेलेस्की हे विनाकारण नाटो देशाचे एकूण नाटो राष्ट्रात सामील होण्याचे स्वप्न पाहत आहे. आणि हे स्वप्न नाकारण्यासाठी रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन हे युक्रेन वर भीषण युद्ध लादले.आणि युक्रेन देशावर भयावा हल्ले करत आहे. आणि अमेरिकेचे व नाटो राष्ट्र जे जगातल्या तीस देशाचे संघटन आहे.आणि नाटो राष्ट्राचा उद्देश एका राष्ट्रावर हल्ला म्हणजे या तीस देशांवर हल्ला होय.आणि या उद्देशाने जाणीवपूर्वक अमेरिका व ही नाटो राष्ट्र युक्रेन ला सैन्य मदत पुरवित आहे. रशिया हा देश संपूर्णपणे सैनिक व युद्ध साहित्य निर्मितीमध्ये घातक शस्त्र, क्षेपणास्त्रे युद्धनौका, सुखोई विमान, म्हणजेच देशाच्या रक्षणासाठी स्वावलंबी तर आहेच. पण जगात सर्वात जास्त अणुबॉम्ब बाळगणारा देश म्हणजे रशिया होय.आहे त्यामुळे नाटो राष्ट्राला केवळ एकच बलाढ्या व सैन्य शक्ती असणारा देश म्हणजे रशिया होय.

भारत विरोधात सुद्धा अमेरिकेची विदेश निती सतत व कायम घातक ठरलेली आहे. त्याचे मुख्य उदाहरण म्हणजे १९७१ च्या पाकिस्तानसोबत युद्ध आणि बांग्ला देश नवीन राष्ट्रनिर्मित साठी पाकिस्तान सोबत भारताला युद्ध पुकारावे लागले. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेने भारताला युद्ध थांबवण्यासाठी आणि पाकिस्तानला समर्थन करण्यासाठी स्वतःची विमान वाहु युद्ध नौका भारताच्या दिशेने पाठवले. तेव्हा रशियाने सुद्धा १९७१ च्या युद्धात भारताच्या समर्थनार्थ स्वतः हाची विमान वाहु युद्ध नौका पाठवलेली आहेच.फरक एवढाच की अमेरिकेने पाठवलेली युद्ध नौका ही भारताच्या विरोधात तर रशिया ने पाठवलेली युद्ध नौका ही भारताच्या समर्थनार्थ होती तेव्हा पासुन जगात भारता सोबत कुठेही धोका निर्माण होत असेल.तेथे रशिया हा भारताचा मित्र राष्ट्र म्हणून उभा राहतो.आणि सध्या संपूर्ण जगाने रशिया व रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादीमीर पुतीन यांना युक्रेन वर सैनिक कारवाई ला अयोग्य ठरवत गुन्हेगार ठरवले जरी असेल.पण भारत देशाने रशिया कडून क्रूड ऑइल(कच्चे तेल) खरेदी करून संपूर्ण जगाला मित्र राष्ट्राचे प्रत्यक्ष पुणे उदाहरण देत आहे.

**-अनंता भालेराव**
**आरोग्य सल्लागार, व सामाजिक कार्यकर्ता**

# जालन्यात महर्षी श्री सदगुरू रामानंद स्वामी सरस्वती तुकाबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** महर्षी श्री सदगुरू रामानंद स्वामी सरस्वती तुकाबाबा यांच्या ३४ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून सुश्रूषा हॉस्पिटल, जालना यांच्या वतीने जिल्ह्यात भव्य मोफत सर्व रोग निदान व वैद्यकीय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत उपचार आणि सल्ला मिळावा, या उद्देशाने हे दोन दिवसीय शिबिर पार पडणार आहे.जालना जिल्ह्यातील दोन वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये हे शिबिर आयोजित करण्यात आले असून त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे:पहिले शिबिर (सिद्धेश्वर पिंपळगाव, ता. घनसावंगी),दिनांक: शुक्रवार, ३० जानेवारी २०२६,वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत,विशेष उपस्थिती: मठाधिपती श्री. एकनाथानंद रामानंद सरस्वती (भोलेबाबा) यांच्या पावन उपस्थितीत हे शिबिर पार पडेल.दुसरे शिबिर (ताडहादगांव, ता. अंबड)

दिनांक: रविवार, १ फेब्रुवारी २०२६ वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत.प्रमुख उपस्थिती ब्र. आत्मानंद म. शास्त्री (तुकाबाबांचे दत्तक पुत्र) यांची या प्रसंगी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या आरोग्य शिबिरात जालन्यातील नामांकित तज्ज्ञ डॉक्टर रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी करणार आहेत.डॉ. संदीप जे. शेळके: हृदयविकार, मधुमेह व अतिदक्षता तज्ज्ञ,डॉ. अमोल सुभाष वाघ: मणका, हाडे व सांधेरोपण शस्त्रक्रिया तज्ज्ञ,डॉ. ऋषिकेश आर. शिंदे: जनरल व लॅप्रोस्कोपिक सर्जन,शबिरातील मोफत चाचण्या: शिबिरात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची शुगर (रक्तशर्करा), उच्च रक्तदाब (बीपी) आणि ई.सी.जी. (ECG) तपासणी पूर्णतः मोफत केली जाणार आहे.

सुश्रूषा हॉस्पिटल, जालना (नाव्हा चौफुली परिसर) येथे अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून, गरजू रुग्णांसाठी महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना (MJPJAY) आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (PMAJAY) अंतर्गत मोफत उपचार केले जातात. याव्यतिरिक्त मुख्यमंत्री सहायता निधी व सर्व प्रकारच्या इन्शुरन्स/कॅशलेस सुविधाही येथे मिळतात.या महाआरोग्य शिबिराचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन सुश्रूषा हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ७०२०१८९३९३ या क्रमांकावर संपर्क साधावा.



**प्रति,**
**माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,**
**मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य)**

**विषय: राजकारणाचे 'पुनर्वसन केंद्र' थांबवा! स्वीकृत नगरसेवक पदी केवळ सामाजिक कार्यकर्त्यांचीच नियुक्ती करण्याबाबत कठोर नियमावली लागू करणेबाबत...**

**महोदय,**
**सप्रेम नमस्कार.**

महाराष्ट्र राज्याने नेहमीच देशाला पुरोगामी विचारांची दिशा दिली आहे. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत जनतेने महायुतीवर जो विश्वास टाकला, त्याबद्दल आपले अभिनंदन. मात्र, सत्ता प्राप्त झाल्यानंतर आता खरी परीक्षा आहे ती पारदर्शक आणि सर्वसमावेशक प्रशासनाची. याच अनुषंगाने, 'स्वीकृत नगरसेवक' (Co-opted Councilor) या पदाच्या गैरवापराकडे मी आपले लक्ष वेधून घेऊ इच्छितो.

गेल्या अनेक दशकांपासून आपण पाहत आहोत की, 'स्वीकृत नगरसेवक' हे पद केवळ राजकीय सोय म्हणून वापरले जात आहे. जे निवडणुकीत पराभूत झाले आहेत किंवा ज्यांचे राजकीय पुनर्वसन करायचे आहे, अशा लोकांसाठी हे पद राखून ठेवले जाते. हा प्रकार लोकशाहीच्या मूळ भावनेला हरताळ फासणारा आहे.

**आमच्या प्रमुख मागण्या आणि आक्रमक भूमिका:**

राजकीय निकष बदला, सामाजिक योगदान पहा: स्वीकृत नगरसेवक निवडताना १५ नगरसेवकांमागे १ असा जो कोटा आहे, त्यात राजकीय कार्यकर्त्यांऐवजी त्या क्षेत्रातील तज्ज्ञ, विचारवंत आणि निष्ठावंत सामाजिक कार्यकर्त्यांनाच संधी द्यायला हवी.

क्षेत्रनिहाय प्रतिनिधीत्व सक्तीचे करा: महानगरपालिकेच्या सभागृहात केवळ राजकारण नको, तर विकास हवा. त्यासाठी पत्रकार, साहित्यिक, लेखक, निवृत्त सैन्य अधिकारी (Ex-Servicemen), पर्यावरण तज्ज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश असणे अनिवार्य करावे.

सामाजिक क्षेत्रात अफाट काम करणाऱ्या पण प्रसिद्धीपासून दूर असणाऱ्या व्यक्तींकडे दांडगा अनुभव असतो. अशा व्यक्तींना सभागृहात स्थान दिल्यास शहराच्या विकासाला एक नवी दृष्टी मिळेल. राजकारण हे सत्तेसाठी असू शकते, पण समाजकारण हे सेवेसाठी असते.

जर प्रत्येक पालिकेत ५-६ तज्ज्ञ व्यक्ती स्वीकृत म्हणून गेल्या, तर ते धोरणात्मक निर्णय घेताना प्रशासनाला मोलाची मदत करू शकतात. यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल आणि कामाचा दर्जा सुधारेल.

माननीय महोदय, आजचा सुशिक्षित तरुण आणि सामान्य नागरिक राजकारण्यांकडे संशयाने पाहत आहे. हा संशय दूर करण्याची हीच सुवर्णसंधी आहे. जर आपण हा धाडसी निर्णय घेतला आणि 'स्वीकृत' पदाचे निकष बदलले, तर महाराष्ट्राचे नाव देशात सुवर्ण अक्षरात कोरले जाईल. केवळ राजकीय सोय म्हणून **'रबर स्टॅम्प'** नगरसेवक नेमण्यापेक्षा, 'समाजाचा आवाज' बनू शकणारे प्रतिनिधी नेमावेत, हीच या पत्राची कळकळ आणि आक्रमक मागणी आहे.

आम्ही अपेक्षा करतो की, आपण या विषयावर गांभीर्याने विचार करून येणाऱ्या काळात नवीन नियमावली जाहीर कराल. अन्यथा, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांमध्ये निर्माण झालेला असंतोष भविष्यात लोकशाहीसाठी घातक ठरेल.

**आपला नम्र,**
**(रमेश कृष्णराव लांजेवार)**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी,**
**नागपूर चौथास्तंभ पुरस्कृत मुक्त पत्रकार (२०१९)**
**पत्ता: ६३ बी, शिवनगर, नागपूर - ०९**

## संक्षिप्त

### दुर्मिळ टपाल तिकीट प्रदर्शनाच्या तारखेत बदल; आता ३१ जानेवारी व १ फेब्रुवारीला आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/टपाल विभागाच्या वतीने शहरात आयोजित करण्यात आलेल्या दुर्मिळ टपाल तिकीट प्रदर्शनाच्या तारखांमध्ये अचानक बदल करण्यात आला आहे. नियोजित वेळापत्रकानुसार हे प्रदर्शन ३० व ३१ जानेवारी रोजी होणार होते, मात्र शासकीय दुखवटा जाहीर झाल्यामुळे आता हे प्रदर्शन ३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी रोजी आयोजित केले जाईल, अशी माहिती डाक विभागातर्फे देण्यात आली आहे.बदललेले वेळापत्रक खालीलप्रमाणे:तपशीलजुनी तारीखनवीन सुधारित तारीखदिनांक३० व ३१ जानेवारी २०२६३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ठिकाणकैलास शिल्प, टी.व्ही. सेंटरकैलास शिल्प, टी.व्ही. सेंटरकाय असेल प्रदर्शनात?या प्रदर्शनात टपाल विभागाच्या इतिहासातील विविध दुर्मिळ तिकिटे, ऐतिहासिक टपाल पाकिटे आणि विशेष संग्रहातील वस्तू मांडण्यात येणार आहेत. तिकीट संग्रहक (झहळश्ररींशश्रळींींी) आणि विद्यार्थ्यांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे.अधिकारी काय म्हणाले?प्रवर डाक अधीक्षक जी. हरीप्रसाद आणि प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे यांनी या बदलाबाबत अधिकृत माहिती दिली आहे. शासकीय दुखवट्यामुळे कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी बदल करण्यात आला असून, नागरिकांनी आणि तिकीट प्रेमींनी सुधारित तारखांची नोंद घेऊन प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन टपाल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### छत्रपती संभाजीनगरमध्ये रंगणार ४६ वे विभागीय पुष्पप्रदर्शन; स्पर्धकांना सहभागाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/शहरातील निसर्गसौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि नागरिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या ४६ व्या विभागीय वार्षिक पुष्पप्रदर्शन व उद्यान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (उपवने व उद्याने) यांच्या वतीने शनिवार दि. १४ व रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी हे प्रदर्शन पार पडणार आहे.या प्रदर्शनात जास्तीत जास्त नागरिकांनी, संस्थांनी आणि हौशी बागायतदारांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन सहायक संचालक प्रसाद कडुलकर यांनी केले आहे.महत्वाच्या तारखा आणि वेळापत्रकस्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेशिका देण्यापासून ते परीक्षणापर्यंतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे:स्पर्धा प्रकारप्रवेशिका कालावधीपरीक्षणाची तारीखउद्यान स्पर्धा३ ते ९ फेब्रुवारी २०२६१० ते ११ फेब्रुवारी २०२६पुष्पप्रदर्शन स्पर्धा३ ते १२ फेब्रुवारी २०२६-स्पर्धेचे स्वरूपउद्यान स्पर्धा ही केवळ एका प्रकारापुरती मर्यादित नसून, उद्यानाचा प्रकार आणि त्याचे क्षेत्रफळ (आकार) यानुसार वेगवेगळ्या गटांमध्ये विभागण्यात आली आहे. यामुळे छोट्या घरगुती बागांपासून ते मोठ्या संस्थात्मक उद्यानांपर्यंत सर्वांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे.प्रवेशिका कुठे मिळतील?इच्छुक स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका खालील पत्त्यावर जमा कराव्यात:पत्ता: सहायक संचालक, उपवन व उद्याने यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, मध्यवर्ती इमारत (विस्तार), अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर.अधिक माहितीसाठी संपर्कस्पर्धेचे नियम, अटी किंवा इतर तांत्रिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधता येईल:प्रसाद कडुलकर (सहायक संचालक): ८१६९३५४९९५बालाजी जवळे (उद्यान पर्यवेक्षक): ८३९००९६६९८हे पुष्पप्रदर्शन केवळ एक स्पर्धा नसून फुलांच्या विविध जाती, सजावटीचे प्रकार आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा एक मोठा उत्सव ठरणार आहे.

### निवडणूक २०२६: मतदारांच्या मदतीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात २४ तास 'हेल्पलाईन' कार्यान्वित

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ ची रणधुमाळी लवकरच सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रत्येक मतदाराला आपला मतदानाचा हक्क विनासायास बजावता यावा आणि त्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात 'स्वतंत्र मतदार मदत व तक्रार निवारण कक्ष' स्थापन करण्यात आला आहे.२४ तास सेवा उपलब्धप्रशासनाने मतदारांच्या सोयीसाठी ०२४०-२३३१०७७ हा विशेष दूरध्वनी क्रमांक जाहीर केला आहे. विशेष म्हणजे ही हेल्पलाईन २४ तास आणि सातही दिवस (२४७) कार्यरत राहणार आहे. यामुळे कामाच्या वेळेव्यतिरिक्तही मतदारांना आपल्या तक्रारी नोंदवता येतील.या कामांसाठी घेता येईल मदत:मतदार खालीलपैकी कोणत्याही कारणांसाठी या कक्षाशी संपर्क साधू शकतात:मतदार यादी: यादीत नाव शोधणे किंवा नावाबाबत खात्री करणे.नवीन नाव नोंदणी: मतदार नोंदणी प्रक्रियेबाबत माहिती मिळवणे.दुरुस्ती व स्थलांतर: नावात बदल, पत्ता बदल किंवा मतदार संघ बदलण्याबाबतच्या अडचणी.प्रक्रियेबाबत शंका: मतदान केंद्राची माहिती किंवा मतदान प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी.प्रशासनाचे आवाहननिवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुलभ व्हावी, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश आहे. मतदारांनी कोणतीही अडचण असल्यास संकोच न करता या कक्षाशी संपर्क साधावा आणि लोकशाहीच्या या उत्सवात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी केले आहे.महत्त्वाची माहिती एका दृष्टिक्षेपात:सुविधातपशीलकक्षमतदार मदत व तक्रार निवारण कक्षठिकाणजिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगरहेल्पलाईन क्रमांक०२४०-२३३१०७७ वेळ२ ४ तास.

# शिष्यवृत्ती अर्जांसाठी जानेवारी अखेरपर्यंतची मुदत; प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याचे प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजनांचे अर्ज सादर करण्यासाठी आता केवळ काही दिवस शिल्लक आहेत.

या योजनांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत जानेवारी अखेरपर्यंत निश्चित करण्यात आली असून, अद्याप अर्ज न केलेल्या किंवा त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांनी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे. प्राप्त आकडेवारीनुसार एकूण प्राप्त अर्ज: ४३ हजार ५०७,मंजुरीसाठी पाठवलेले अर्ज: २८ हजार ८७८ (महाविद्यालयांकडून विभागाकडे वर्ग) छाननी प्रक्रियेतील अर्ज: १२ हजार ६४८ (महाविद्यालय स्तरावर प्रलंबित) त्रुटी असलेले अर्ज (Send Back) १ हजार ८७२ (कागदपत्रे अपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांकडे परत) नामंजूर अर्ज: ९३ (चुकीच्या योजनेची निवड केल्यामुळे) राईट टू गिव्ह अप: १६ विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने शिष्यवृत्ती नाकारली आहे.

विद्यार्थ्यांनी 'या' गोष्टींकडे लक्ष द्यावे

ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज 'Send Back' करण्यात आले आहेत, त्यांनी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन नेमकी काय त्रुटी आहे हे तपासावे. अनेकदा उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला किंवा मागील वर्षाची गुणपत्रिका अपूर्ण असल्यामुळे अर्ज अडकून पडतात.

अशा विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज पुन्हा सादर करावा, जेणेकरून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यात अडचण येणार नाही.महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज आणि कागदपत्रांच्या त्रुटींमुळे अडकलेले अर्ज तातडीने दुरुस्त करून परिपूर्ण स्वरूपात सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे. मुदत संपल्यानंतर तांत्रिक अडचणी येऊ शकतात, त्यामुळे शेवटच्या क्षणाची वाट न पाहता ही प्रक्रिया पूर्ण करणे हिताचे ठरेल.

### कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास साधावा - डॉ. गायकवाड

जालना / प्रतिनिधी / आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करून स्वतः ची कौशल्ये विकसित करावीत. तंत्रज्ञानाचा नैतिक वापर करूनच विद्यार्थी आपला शैक्षणिक, बौद्धिक व सामाजिक विकास साधू शकतात, असे प्रतिपादन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांनी केले.स्थानिक अंकुशराव टोपे महाविद्यालयात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.मान्यवरांची उपस्थिती: या सोहळ्याला माजी प्राचार्य डॉ. राजेंद्र गायकवाड, प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंग डावकर, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर व कार्यालयीन अधीक्षक सुरेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रतिमा पूजन व ध्वजारोहण: कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी व संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले.महाविद्यालयातील विविध विभागांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या माहितीपूर्ण भित्तिपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

### पाचोड येथे 'मानसिक व सामाजिक आरोग्य संवर्धन' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

आत्ताच एक्सप्रेस

पाचोड (प्रतिनिधी) आजच्या धावपळीच्या युगात मानसिक आरोग्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर पाचोड येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि पीएम उषा फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रमांतर्गत 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने मानसिक व सामाजिक आरोग्य संवर्धन मार्ग या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.तणावमुक्त जीवनशैलीचा मंत्र कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक पाचोड ग्रामीण रुग्णालयाचे आरोग्य अधिकारी डॉ. कैलास दौंड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांमध्ये वाढणारा मानसिक तणाव, त्याची कारणे आणि लक्षणे यावर सविस्तर प्रकाश टाकला. डॉ. दौंड म्हणाले की, मानसिक संतुलन राखण्यासाठी सकारात्मक जीवनशैली आणि सुदृढ सामाजिक नातेसंबंध आवश्यक आहेत. समस्या उद्भवल्यास समुपदेशनाची मदत घेण्यास कचरू नका.सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी आपल्या भाषणात कार्यालयीन कामकाजात परस्पर सहकार्य आणि संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. मानसिक आरोग्य उत्तम असेल तरच कामाची गुणवत्ता वाढते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

उपस्थित मान्यवर यावेळी रासेयो सहकार्यक्रमाधिकारी डॉ. भगवान जायभाय यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले, तर आभार डॉ. संतोष चव्हाण यांनी मानले.

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूल प्रवेश स्पर्धा परीक्षा १ मार्च रोजी; १८ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/ आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कूलमधील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेशासाठीची प्रक्रिया सुरू झाली आहे. या शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी होणारी स्पर्धा परीक्षा रविवार, १ मार्च २०२६ रोजी होणार असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आपले अर्ज सादर करणे अनिवार्य आहे.

पात्रता आणि अटी या परीक्षेसाठी खालील विद्यार्थी पात्र ठरतील,प्रवर्ग: केवळ अनुसूचित जमातीचे (ST) विद्यार्थी,सध्याचे वर्ग: सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी, ६ वी, ७ वी आणि ८ वी मध्ये शिकत असलेले विद्यार्थी,शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी.

अर्ज प्रक्रिया कशी करावी?

१. अर्ज कोठे मिळतील: विहित नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे विनामूल्य उपलब्ध आहेत. २. अर्ज सादर करणे: शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेऊन ते १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे जमा करायचे आहेत.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या अधिनस्त असलेल्या धारणी, पांढरकवडा, किनवट, अकोला, छत्रपती संभाजीनगर, पुसद आणि कळमनुरी या सात प्रकल्प कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील १२ जिल्ह्यांमधील पात्र विद्यार्थी या परीक्षेसाठी अर्ज करू शकतात.महत्त्वाची टीप: वेळेत अर्ज सादर न केल्यास विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसता येणार नाही. त्यामुळे पालकांनी आणि मुख्याध्यापकांनी त्वरित कार्यवाही करावी, असे आवाहन प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे यांनी केले आहे.




# फुलंब्री तालुक्यात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; शासकीय व निमशासकीय कार्यालयांत ध्वजारोहण

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/प्रतिनिधी**/भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा फुलंब्री तालुक्यात अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. तालुक्यातील विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करून संविधानाचा जयघोष करण्यात आला. तालुक्यातील मुख्य शासकीय कार्यालयांमध्ये सकाळी ठराविक वेळेत ध्वजारोहण पार पडले. यामध्ये प्रामुख्याने खालील मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला:



तहसीलदार योगिता खटावकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महसूल विभागाचे कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गटविकास अधिकारी (इऊज) उषा मोरे यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला.फुलंब्री नगरपंचायतीमध्ये नगराध्यक्ष राजेंद्र ठोंबरे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.फुलंब्री पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक संजय सहाने यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना दिली.बाजार समितीच्या आवारात सभापती तथा आमदार अनुराधा चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

प्रशासकीय कार्यालयासोबतच तालुक्यातील इतर महत्त्वाच्या संस्थांमध्येही हा सोहळा पार पडला. सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामीण रुग्णालयात अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राष्ट्रगीत होऊन तिरंग्याला सलामी देण्यात आली. फुलंब्री जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले, यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून देशप्रेमाच्या घोषणा दिल्या.या कार्यक्रमाप्रसंगी तालुक्यातील लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. सर्वत्र शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय**
**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**
ई-मेल- aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी / २०२४/प्र.क्र.१४४/इमा-२ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई-निविदा सूचना क्रं. ४३२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०४) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका / छ.स. न. जाहि / ५६९/२०२५-२०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

नियमित वाचा आत्ताच एक्सप्रेस

# माहिती अधिकाराचा कचरा! गंगापूरच्या गट विकास अधिकाऱ्यांची मुजोरी; भ्रष्टाचाराचे 'पितळ' उघडे पडण्याच्या भीतीने माहिती देण्यास टाळाटाळ?

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर (प्रतिनिधी)** पारदर्शक कारभाराचा दावा करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेचा खरा चेहरा आता समोर येऊ लागला आहे. गंगापूर तालुक्यातील भालगाव ग्रामपंचायतीमधील कथित भ्रष्टाचाराची प्रकरणे दडपण्यासाठी चक्क माहिती अधिकार कायद्यालाच केराची टोपली दाखवली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. भालगाव येथील विकासकामांची माहिती मागणाऱ्या अर्जदाराला माहिती देण्याऐवजी गंगापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी (BDO) सुहास वाकचौरे यांनी तुला कोणाकडे अर्ज करायचे ते कर, मी कोणाला घाबरत नाही, अशी मुजोर भाषा वापरल्याचा गंभीर आरोप राहुल अण्णासाहेब काकडे यांनी केला आहे.

नेमके प्रकरण काय? भालगाव ग्रामपंचायतीच्या अंतर्गत झालेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप राहुल काकडे यांनी केला आहे. या कामांची सत्यता पडताळण्यासाठी त्यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत गंगापूर पंचायत समितीकडे तब्बल १५ अर्ज दाखल केले होते. नियमानुसार ठराविक काळात माहिती मिळणे अपेक्षित असताना, प्रशासनाकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात येत आहे.

१५ अर्जांपैकी केवळ २ अर्जांवर सुनावणी! काकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी सादर केलेल्या १५ अर्जांपैकी प्रशासनाने केवळ २ अर्जांवर सुनावणी घेतली.

मात्र, त्या सुनावणीचा निकाल काय लागला किंवा त्याबाबत काय कार्यवाही झाली, याची कोणतीही अधिकृत माहिती अद्याप अर्जदाराला देण्यात आलेली नाही. उर्वरित १३ अर्जांचे काय झाले? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

BDO सुहास वाकचौरे यांची मुजोरी? २८ जानेवारी २०२६ रोजी राहुल काकडे यांनी गट विकास अधिकारी सुहास वाकचौरे यांची भेट घेऊन आपल्या अर्जांबाबत विचारणा केली. मात्र, एका जबाबदार पदावर असलेल्या अधिकाऱ्याने अर्जावर कायदेशीर कार्यवाही करण्याऐवजी, तुला कोणत्या चॅनेलला बातमी टाकायची ती टाकून दे, मी घाबरत नाही, अशा शब्दांत उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे काकडे यांनी सांगितले. शासकीय अधिकाऱ्याची ही वृत्ती लोकशाहीला घातक ठरत असल्याची चर्चा आता तालुक्यात रंगली आहे.




अधिकारी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांचे 'साटंलोटं'? भालगावचे ग्रामविकास अधिकारी आणि पंचायत समितीचे वरिष्ठ अधिकारी यांच्या संगनमतानेच ही माहिती दडपली जात असल्याचा थेट आरोप राहुल काकडे यांनी केला आहे.

भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पडेल आणि कारवाईची कुऱ्हाड कोसळेल, याच भीतीपोटी ही माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे का? असा रोखठोक प्रश्न त्यांनी विचारला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, जर माहिती मिळाली नाही तर वरिष्ठ पातळीवर तक्रार करण्याचा आणि

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत २ फेब्रुवारीला 'लोकशाही दिन'; तक्रारदारांसाठी महत्त्वाची नियमावली जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**/२९ जानेवारी २०२६ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी 'लोकशाही दिन' आयोजित केला जातो. त्यानुसार, सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका स्तरावरील लोकशाही दिन उत्साहात पार पडणार आहे.हा लोकशाही दिन महानगरपालिकेच्या मुख्यालयातील प्रशासकीय समिती कक्ष येथे सकाळी १०:०० वा.आयोजित करण्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली हे सत्र पार पडेल, जिथे नागरिक आपल्या प्रलंबित समस्या थेट प्रशासनासमोर मांडू शकतील.महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या सुधारित परिपत्रकानुसार, या लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी काही तांत्रिक अटींचे पालन करणे अनिवार्य आहे.पूर्व नोंदणी आवश्यक: ज्या नागरिकांनी लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी विहित नमुन्यात आणि आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज सादर केले आहेत, केवळ त्यांनाच २ फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष अर्ज सादर करण्याची आणि आपली बाजू मांडण्याची परवानगी दिली जाईल.फेर-अर्जाची आवश्यकता नाही: ज्या तक्रारदारांनी मागील लोकशाही दिनात अर्ज दिले आहेत आणि त्यांच्या प्रकरणावर अद्याप कार्यवाही सुरू आहे, अशा नागरिकांनी पुन्हा नवीन अर्ज देण्याची गरज नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.महानगरपालिकेचे उपायुक्त तथा लोकशाही दिनाचे मुख्य समन्वयक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस



## संक्षिप्त

## प्रजासत्ताक दिनाचे औचित्य: हंस फाउंडेशनतर्फे घुंगर्डे हादगाव येथे भव्य रक्तदान शिबिर संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत, जालना जिल्ह्यातील घुंगर्डे हादगाव येथे हंस फाउंडेशनच्या वतीने २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मारुती मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिरात युवक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक बांधिलकी जोपासली.

शिस्तबद्ध आयोजन आणि मोठा प्रतिसाद

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेले हे शिबिर अतिशय शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. केवळ घुंगर्डे हादगावच नव्हे, तर परिसरातील अनेक गावांतील रक्तदात्यांनी यात सहभाग नोंदवला. ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये रक्तदानाविषयी असलेली भीती दूर होऊन एक सकारात्मक जनजागृती या निमित्ताने पाहायला मिळाली.

हंस फाउंडेशनचा सामाजिक वारसा

हंस फाउंडेशन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जनजागृतीसाठी सक्रिय आहे. समाजातील वंचित, अनाथ, निराधार आणि गोरगरीब घटकांसाठी ही संस्था सातत्याने विविध उपक्रम राबवत असते. गरजू आणि गंभीर रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी रक्ताची उपलब्धता होणे ही काळाची गरज आहे, याच उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचे मनोबल वाढवले. यामध्ये प्रामुख्याने कल्याणजी सोळुंके सर (मुख्याध्यापक, मत्स्योदरी शाळा),अंबरसिंग परिहार, रामसिंग पवार, सचिन पवार, पवन परिहार,कृष्णा परीहार, करण पवार, कौसर भाई पठाण, संतोष काकडे,रवी भद्रे, विश्वजीत परिहार, रणजीत परिहार, रघुनाथ भद्रे,शशिकांत पांढरे, परमेश्वर पवार, अभिनय मोतेकर, शरद परिहार,बापू मस्के, माऊली काळे, आकाश पवार, चरणसिंग पवार,ज्ञानेश्वर नांद्रे, माऊली दोबोले, हनुमान परिहार याप्रसंगी जनकल्याण रक्तपेढीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी तांत्रिक सहकार्य केले.शिबिराच्या अखेरीस आयोजकांनी सर्व रक्तदात्यांचे आणि सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे आभार मानले. भविष्यातही लोकहिताचे आणि समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवण्यात येतील, असा विश्वास हंस फाउंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अंबडच्या 'सहयोग' पतसंस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा संपन्न



**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबड (प्रतिनिधी)** शहरातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह मानल्या जाणाऱ्या सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रौप्य महोत्सवी वर्धापन दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने भव्य रक्तदान शिबिर आणि ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सभासदांचा आणि ठेवीदारांचा विश्वास हीच संस्थेची सर्वात मोठी पावती आहे, असे गौरवद्गार संस्थापक अध्यक्ष ओमप्रकाश उबाळे यांनी यावेळी काढले.वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित ग्राहक मेळाव्यात, गेल्या २५ वर्षांपासून संस्थेशी एकनिष्ठ असलेल्या प्रतिनिधिक २५ सभासद, ठेवीदार आणि कर्जदारांचा संस्थेच्या वतीने शाल, पुष्पहार आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून 'समाजभान' टीमचे दादासाहेब थेटे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे, आणि सचिव तथा होळकर अभ्यासक रामभाऊ लांडे यांची उपस्थिती होती.

ओमप्रकाश उबाळे (संस्थापक अध्यक्ष): गेल्या २५ वर्षात पारदर्शक कारभारामुळे आम्ही ग्राहकांचा विश्वास संपादन करू शकलो. आज ही संस्था नंबर वन स्थानी असल्याचा आम्हाला अभिमान आहे.संतोष सोमाणी (अध्यक्ष): सहयोग पतसंस्था ही ग्राहकांना बँकिंग क्षेत्रातील सर्व अद्ययावत सुविधा देणारी एकमेव संस्था आहे. भविष्यात तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सोपी आणि सुलभ बँकिंग प्रणाली कार्यान्वित करणार आहोत.

सहयोग पतसंस्था आणि समाजभान टीम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी मोठा प्रतिसाद दिला. सामाजिक जबाबदारीचे भान राखत संस्थेने राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.या सोहळ्याला उपाध्यक्ष इंजि. तुकाराम गावडे, संचालक सर्वश्री प्रल्हाद जाधव, तुकाराम भापकर, गणेशलाल लाहोटी, चंद्रप्रकाश गिल्डा, संभाजी वराडे, ड. सतीश भावले, विनोद उदावंत, इंजि. ए.एस. कनके, लेहरचंद मोता, महेंद्र मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच व्यवस्थापक प्रकाश परजने, कर्मचारी शैलेश मूत्रक, गणेश भापकर, श्रीनिवास धारतरकर यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, वकील, डॉक्टर आणि मोठ्या संख्येने शेतकरी व सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इंजि. तुकाराम गावडे यांनी केले.

बातमी लेखन: गणेश सपकाळ (जालना जिल्हा प्रतिनिधी)

## मिशन वात्सल्य व मिशन शक्ती अंतर्गत जिल्हास्तरीय बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** महिला व बालविकास गांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मिशन वात्सल्य व मिशन शक्ती' योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात एकल महिला पुनर्वसन, मिशन शक्ती अंतर्गत जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती तसेच मिशन वात्सल्य त्रैमासिक आढावा बैठक यांचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना पी. एम. मिन्नू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे,पोलीस उप अधीक्षक निकाळजे, व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक मंगेश केदार, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी गणेश चिमणकर, युनिसेफच्या सदस्य अल्पा वोरा यांच्यासह संबंधित विभागातील अधिकारी यांची उपस्थिती होती.जालना जिल्हात घटस्फोटित, परित्यक्ता, विधवा व अविवाहित अशा एकूण ६९,३५८ एकल महिला आहेत. यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वकष प्रयत्न होणे गरजेचे आहे.यासाठी तालुकानिहाय एकल महिलांसाठी मेळाव्याचे आयोजन करुन,यांना सर्वप्रथम शासकीय कागदपत्रे उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच या महिलांसाठी आरोग्य, पोषण व त्यांच्यासाठी शासन स्तरावरुन ज्या काही योजना राबविल्या जातात, त्यांची माहिती व लाभ पोहचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या महिलांचा समावेश महिला बचत गटात करणे, बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देणे, रोजगार विषयक कार्यशाळा आयोजित करणे. तसेच या बैठकीत एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सद्यस्थिती, लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधा, तसेच त्यांना आर्थिक, सामाजिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र शासन

# सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ जालना

महाराष्ट्र शासन

**ई-निविदा सुचना क्र. ११ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम क्र. २ जालना कडुन जालना जिल्हयातील (१) कामासाठी ब-१ नमुन्यातील ई-निविदा (ऑन लाईन) मागविण्यात येत आहेत. निविदेचा सविस्तर तपशील खालील संकेतस्थळावर पहाता येईल. एक किंवा सर्व निविदा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत. संबधीत नोदणीकृत ठेकेदारांनी नोंद घ्यावी.

१.www.mahapwd.com 2.www.mahatenders.gov.in

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ जालना**

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C५४३२

## जालन्यात लाचखोर तलाठ्याला बेड्या; ५ हजारांची लाच घेताना 'एसीबी'च्या जाळ्यात!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/जालना/प्रतिनिधी/** सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराची कीड संपवण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा आपला दणका दाखवला आहे. जालन्यातील सिंधी काळेगाव सजा येथील लाचखोर ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) गजानन मनसाराम बारवाल याला ३,००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. वारसा हक्काची नोंद करण्यासाठी एका सर्वसामान्य नागरिकाला वेठीस धरणारा हा अधिकारी आता स्वतःच कायद्याच्या कचाट्यात अडकला आहे.

काय आहे संपूर्ण प्रकरण?

तक्रारदाराच्या वडिलांच्या निधनानंतर, वारसा हक्काने फेरफार मध्ये नाव नोंदवण्यासाठी तक्रारदाराने २७ जानेवारी २०२६ रोजी सर्व आवश्यक कागदपत्रे तलाठी गजानन बारवाल याच्याकडे सोपवली होती. मात्र, हे हक्काचे काम करण्यासाठी या भ्रष्ट अधिकाऱ्याने तक्रारदाराकडे ५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली.भ्रष्टाचारापुढे न झुकता, तक्रारदाराने तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे धाव घेऊन तक्रार नोंदवली.

तडजोड केली अन् जाळ्यात अडकला!

एसीबीच्या पथकाने २८ जानेवारी रोजी या तक्रारीची पडताळणी केली असता, बारवाल याने वारसा हक्काची फाईल मंडळाधिकाऱ्यांकडे पाठवण्यासाठी ५,००० रुपयांची मागणी केली आणि तडजोडीनंतर ३,००० रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.

भररस्त्यात 'एसीबी'ची धडक कारवाई

ठरल्याप्रमाणे, जालना येथील रूपनगर भागातील मनोज वाघमारे यांच्या घराच्या गाळ्यात चालणाऱ्या तलाठी सजा कार्यालयासमोर रस्त्यावरच हा व्यवहार सुरू होता. गजानन बारवाल याने जशी तक्रारदाराकडून ३,००० रुपयांची लाच स्वीकारली, तशी दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने त्याला झडप घालून ताब्यात घेतले.

घरझडती आणि पुढील कारवाई

आरोपी: गजानन मनसाराम बारवाल (वय ३६ वर्षे, वर्ग ३ कर्मचारी) आरोपीच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.जालना तालुका पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास 'एसीबी' जालना घटक करणार आहे.ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे, आणि पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सापळा पथकाचे नेतृत्व पोलीस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांनी केले, ज्यांना कोमल शिंदे, अशोक नागरगोजे, रवींद्र काळे, विलास चव्हाण आणि चांगदेव बागुल यांनी मोलाची मदत केली.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे आवाहन: जर कोणताही लोकसेवक कामासाठी लाचेची मागणी करत असेल, तर घाबरू नका! तातडीने एसीबीच्या १०६४ या टोल फ्री क्रमांकावर किंवा व्हॉट्सअप क्रमांक ७७२०८९१०६४ वर संपर्क साधा. भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी सहकार्य करा.

## विभाजनकारी नियमांना सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती;महेश धनावत यांनी केले स्वागत

आत्ताच एक्सप्रेस

नवी दिल्ली/प्रतिनिधी/ सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एका महत्त्वपूर्ण निर्णयात 'विद्यापीठ अनुदान आयोग (समानतेचा प्रचार) विनियम, २०२६' ला स्थगिती दिली आहे. हे नियम अस्पष्ट असून समाजात फूट पाडणारे आहेत, असे निरीक्षण सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने नोंदवले. या निर्णयाचे नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश धनावत यांनी स्वागत केले असून, याला न्यायाचा विजय म्हटले आहे.

न्यायालयाने म्हटले की, या नियमांमधील 'जाती-आधारित भेदभावाची' व्याख्या संकुचित असून ती केवळ ठराविक वर्गापुरती मर्यादित आहे, जे कलम १४ चे उल्लंघन आहे. विशेषतः वेगवेगळ्या जातींसाठी स्वतंत्र वसतिगृहे प्रस्तावित करण्याच्या कल्पनेवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. आपण प्रतिगामी समाज घडवत आहोत का? असा सवाल करत सरन्यायाधीशांनी सामाजिक सलोखा टिकवण्यावर भर दला.

धनावत यांनी प्रतिक्रिया दिली की, समानतेच्या नावाखाली भेदभावाची बीजे रोवणारे नियम रद्द होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. न्यायालयाने आता १९ मार्चपर्यंत स्थगिती कायम ठेवत २०१२ चे जुने नियम लागू ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## जालना येथे अजितदादा पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि खंबीर नेतृत्व अजितदादा पवार यांचे जनसेवेच्या दौऱ्यावर असताना विमान दुर्घटनेत अपघाती निधन झाले. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, जालन्यातील नागसेन ग्रंथालय व भीम उद्योग अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.श्रद्धांजली सभेदरम्यान उपस्थितांनी अजितदादांच्या कार्याचा गौरव केला. राज्याच्या विकासासाठी धोरणात्मक निर्णय घेताना नेहमीच निर्भिड भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. प्रशासनावर असलेली त्यांची पकड आणि जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला होता. त्यांच्या निधनाने राज्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. नागसेन ग्रंथालयात आयोजित करण्यात आलेल्या या शोकसभेत विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. त्यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत श्रद्धांजली वाहिली. यामध्ये प्रामुख्याने खालील पदाधिकारी उपस्थित होत.



राजेश राऊत, संजय भालेराव, विनोद रत्नपारखे (सिव्हिल इंजिनिअर), संजय खरात, राजेश बाभले, शेख अकबर, सचिन भदर्गे, इंगोले, दशरथ झिने या प्रसंगी भीम उद्योग अभियान आणि नागसेन ग्रंथालयाचे सर्व अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अजितदादांच्या जाण्याने प्रशासनातील शिस्त आणि विकासाची गती मंदावली आहे, असे मत उपस्थितांनी यावेळी व्यक्त केले.

## गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/गुरुपिंपरी (ता. घनसावंगी): देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून गोदावरी माध्यमिक विद्यालय, गुरुपिंपरी येथे अत्यंत उत्साही आणि देशभक्तीपर वातावरणात ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि ग्रामस्थांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे गावातून काढण्यात आलेल्या भव्य 'प्रभात फेरी'ने झाली. भारत माता की जय आणि वंदे मातरम च्या जयघोषाने संपूर्ण गुरुपिंपरी परिसर दुमदुमून गेला होता.

त्यानंतर शाळेच्या प्रांगणात मुख्य ध्वजारोहण सोहळा पार पडला. गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रुद्रप्रतापभैय्या पवार यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला आणि राष्ट्रगीत गायले गेले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भागवत कडुळे सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून रुद्रप्रतापभैय्या पवार उपस्थित होते. तसेच गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध संघटनांचे पदाधिकारी, अंगणवाडी सेविका,




बचत गटातील महिला, सहकारी सोसायटीचे पदाधिकारी आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत विविध क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सचिव रुद्रप्रतापभैय्या पवार आणि मुख्याध्यापक कडुळे सर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या ओघवत्या बोलीभाषेतून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन राजेंद्र थोरात सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राहुल मोटे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक गणेश सपकाळ,सुभाष काकडे,प्रदीप गायके,गणेश वाघुडे,गणेश पाचारे,सुधाकर गोरे,अमोल सोळके यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## भोकरदनच्या पायोनीयर स्कूलचा झेंडा जिल्हास्तरावर; 'वीरगाथा पर्व ५.०' स्पर्धेत ओम गिरी प्रथम

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/ प्रतिनिधी**/केंद्र सरकारच्या संरक्षण मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'वीरगाथा पर्व ५.०' या अत्यंत प्रतिष्ठेच्या उपक्रमात भोकरदन येथील जनविकास शिक्षण संस्था संचलित पायोनियर इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल (जोमाळा) च्या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले आहे. शाळेचा इयत्ता ९ वीचा विद्यार्थी ओम मनोज गिरी याने या स्पर्धेत जालना जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या आणि शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

भारतीय सैनिकांचे शौर्य, त्यांचे बलिदान आणि देशप्रेम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने केंद्र सरकारकडून 'वीरगाथा' प्रकल्पाचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत पार पडलेल्या या स्पर्धेत ओम गिरी याने इयत्ता ९ वी ते १० वी या गटातून सहभाग घेतला होता. त्याने आपल्या कलागुणांच्या जोरावर सादर केलेल्या कलाकृतीला जिल्हा स्तरावर सर्वोत्तम मानले गेले.



ओम गिरी याच्या या देदीप्यमान यशाबद्दल नुकताच जालना येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (DIET) प्राचार्या एस.आर. देशमुख आणि जिल्हा समन्वयक भारत सुर्यवंशी यांच्या हस्ते ओम गिरी आणि त्याच्या पालकांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील अनेक शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

ओमच्या या यशाबद्दल जनविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख व सर्व संचालक मंडळाने त्याचे विशेष कौतुक केले. तसेच शाळेचे प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी ओमचे अभिनंदन करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अशा राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांत यश मिळवल्याने सर्वत्र आनंद व्यक्त केला जात आहे.

## जालना: जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक उद्या; नागरिकांना तक्रारी मांडण्याची संधी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उद्या, शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडणार असून, यामध्ये ग्राहक संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीबाबत आणि प्रलंबित समस्यांबाबत चर्चा केली जाणार आहे.जिल्हाधिकारी आशिमा मित्तल वेळ आणि ठिकाण: सकाळी ११ वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, जालना यांच्या उपस्थिती समितीवर नियुक्त केलेले सर्व शासकीय व अशासकीय सदस्यांना या बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.जर कोणा सामान्य नागरिकाची ग्राहक हितासंदर्भात काही तक्रार असेल, तर त्यांनी या बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला लेखी अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.जालना जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (jalna.nic.in) ग्राहकांसाठी स्वतंत्र तक्रार पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. ज्या नागरिकांना बैठकीस येणे शक्य नाही, त्यांनी या पोर्टलच्या माध्यमातून आपल्या समस्या नोंदवाव्यात, असे जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव सविता चौधर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

**टीप:** ग्राहकांनी आपली फसवणूक किंवा सेवांमधील त्रुटींबाबतचे पुरावे आणि अर्ज सोबत ठेवावेत, जेणेकरून तक्रार निवारण प्रक्रियेला गती मिळेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813